नगर जिल्ह्यातील आंदोलनाची तीव्रता वाढली; ठिकठिकाणी बंद, मोर्चे, रास्ता रोको

एसटी बससेवा ठप्प; प्रवाशांचे हाल; लोकप्रतिनिधींचे राजीनामे

लोकसत्ता प्रतिनिधी/
ठिकठिकाणचे वार्ताहर

नगर : मराठा आरक्षण मागणीसाठी जिल्ह्यातील आंदोलनाची व्याप्ती व तीव्रता वाढू लागली आहे. संगमनेरमधील तरुणाने आत्महत्या केली. ठिकठिकाणी बंद, रास्ता रोको, मोर्चे, उपोषण, धरणे आंदोलने सुरू करण्यात आली आहेत. आरक्षणाच्या मागणीसाठी लोकप्रतिनिधींनी राजीनामास्त्र उगारले आहे. आंदोलकांकडून एसटी बस लक्ष्य केले जाण्याची शक्यता लक्षात घेऊन महामंडळाने बहुतांशी आगारातील बससेवा बंद ठेवली आहे. केवळ पारनेरमध्ये अंशतः सुरू होती. त्यामुळे प्रवासी व विद्यार्थ्यांचे मोठे हाल झाले. सुदैवाने एसटी बसबाबत जिल्ह्यात कोठे अनुचित प्रकार घडला नाही. मात्र, खासगी वाहनचालकांकडून जास्त भाडे आकारले जाऊ लागले आहे. त्यामुळे प्रवाशांची लूट सुरू झाली आहे.

सकल मराठा समाजाने नगर-छत्रपती संभाजी महामार्गावरील मिरावली पहाडा फाटा येथे भाजपचे युवा नेते अक्षय कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको केले. सकल मराठा समाजाच्या वतीने शहरातील तहसील कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू केले होते. परंतु, आंदोलनाची तीव्रता वाढवण्यासाठी काल रविवारपासून अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

मनोज जरांगे यांच्या बेमुदत उपोषणाला पाठिंबा म्हणून मराठा आरक्षणासाठी संगमनेर बसस्थानक परिसरात चालू असलेल्या आंदोलनात महाविद्यालयीन युवक-युवतीही सहभागी झाले.

राजकीय नेत्यांचे फलक रात्रीतून हटवले

मराठा आरक्षण आंदोलनाचे लोण राज्यभर पसरत चालले आहे. ठिकठिकाणी राजकीय नेत्यांच्या फलकांना काळे फासले जात आहे. दोन दिवसांपूर्वी शिक्षकांच्या अधिवेशनात घुसून राजकीय नेत्यांचे फलक फाडण्यात आले. या पार्श्वभूमीवर नगर महापालिकेने काल सोमवारी रात्री उशिरा शहरातील राजकीय नेत्यांचे फलक हटवण्याची मोहीम हाती घेतली. ती मध्यरात्रीपर्यंत सुरू होती.

कर्जत व अकोल्यात कडकडीत बंद

कर्जत व अकोले शहरासह या तालुक्यातील अनेक गावांतून बंद पाळण्यात आला. कर्जतच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. कर्जतमधील काही शाळांतून सहामाही परीक्षेचा आजचा पेपर रद्द करण्यात आला. तो नंतर घेण्यात येणार आहे. अकोल्यातील बंदलाही चांगला प्रतिसाद मिळाला. शहराशिवाय तालुक्यातील अनेक गावांत कडकडीत बंद पाळण्यात आला. महाविद्यालय व शाळाही बंद होत्या. कळस येथे शांताराम वाघचौरे यांनी तीन दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केली आहे. गावात आज रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. वीरगाव येथे मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी महाआरती करण्यात आली. देवठाण, गणोरे, पिंपळगाव, डोंगरगाव, इंदोरी, रुंबोडी, मेहेंदुरी, समशेरपूर, टाहाकरी, सावरगाव पाट येथे बंद पाळण्यात आला. अंबड येथे वकील गुणरत्न सदावर्ते यांच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.

नगर तालुक्यात ग्रामपंचायत सदस्यांचे राजीनामे

तालुक्यातील निंबळक येथे कडकडीत बंद पाळून रात्री कॅन्डल मार्च काढण्यात आला. राजकीय नेत्यांना गावबंदी करण्यात आल्याची माहिती सरपंच प्रियांका लामखडे यांनी दिली. चास, कामरगाव, भोईरे पठार, भोयरे खुर्द, पिंपळगाव वाघा, भोरवाडी येथील मराठा समाज बांधवांनी कामरगाव ते नगर तहसील कार्यालय असा २० किमी अंतराचा पायी मोर्चा काढून तहसीलदारांना निवेदन दिल्याची माहिती सरपंच तुकाराम कातोरे यांनी दिली. बाबुर्डी घुमट येथील भीमसैनिक शेखर पंचमुख यांनी लाक्षणिक उपोषण केले. बाबुर्डी घुमटचे उपसरपंच अंकुश शेळके, कापूरवाडीच्या संचालिका ज्योती दुशिंगे, पिंपळगाव माळवीच्या पाच सदस्यांनी व भोयरे पठार ग्रामपंचायतच्या दोन सदस्यांनी पदाचे राजीनामे दिले.

नगरसेविका कमल सप्रेंचा राजीनामा

शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या नगरसेविका कमल सप्रे यांनी आज नगरसेवकपदाचा राजीनामा महापालिका आयुक्त डॉ. पंकज जावळे यांच्याकडे सुपूर्त केला. महाराष्ट्रात मराठा समाज मोठ्या प्रमाणावर असताना राजकारणी स्वतःच्या फायद्यासाठी त्यांचा वापर करतात, याचा निषेध म्हणून राजीनामा देत असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी त्यांनी शहरातील नागापूर बोल्हेगाव परिसरातील विकासकामे होत नाहीत म्हणून पक्षाचा राजीनामा दिला होता.

डॉक्टर व वकिलांचा पाठिंबा

शहरातील वकील व डॉक्टरांनीही आरक्षण मागणी व मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठिंबा दिला. शहर वकील संघटनेची बैठक सभा सुरेश लगड यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत पाठिंब्याचा ठराव करण्यात आल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष संजय पाटील यांनी दिली. संघटनेचे पदाधिकारी राजाभाऊ शिर्के, गौरव दांगट, अजिंक्य काळे, रामेश्वर कराळे, नितीन खैरे, भूषण बराटे, अनिल सरोदे, सतीश गुगळे, रफिक शेख आदी उपस्थित होते. मराठा समाजातील डॉक्टरांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन आरक्षणाला पाठिंबा दिला. डॉ. सुनील पांडुळे, विजय कवळे, अविनाश मोरे, मंगेश काळे, अरविंद गायकवाड, सुनील बोठे, मंगेश जाधव, अमित पवार आदी उपस्थित होते.

मराठा आरक्षणासाठी सरपंच, उपसरपंचांसह सदस्यांचे राजीनामे

लोकसत्ता वार्ताहर

कर्जत : मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनास पाठिंबा म्हणून कर्जत तालुक्यातील कानगुडवाडी ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य यांनी आपल्या पदाचे राजीनामे गटविकास अधिकारी प्रदीप शेंडगे यांच्याकडे दिली आहेत. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे बेमुदत उपोषण करून आंदोलन सुरू आहे. त्यांच्या या आंदोलनास पाठिंबा म्हणून कर्जत तालुक्यातील कानगुडवाडी ग्रामपंचायतचे सरपंच श्याम कानगुडे, उपसरपंच उद्धव कानगुडे, ग्रामपंचायत सदस्य शोभा कानगुडे, स्वाती कानगुडे, कुंडलिक कानगुडे, संगीता भीताडे, बाळू कानगुडे, अनुसया कानगुडे, यमुना कानगुडे या सर्वांनी आज कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रदीप शेंडगे यांच्याकडे दिले आहेत.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस युवकचे तालुकाध्यक्ष नितीन धांडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सुनील शेलार, नगरसेवक प्रसाद ढोकरीकर व लालासाहेब शेळके, विजय नेटके, सोशल मीडियाचे प्रमुख दीपक यादव, सचिन मांडगे, आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सरपंच श्याम कानगुडे म्हणाले की, मराठा समाजासाठी जरांगे पाटील यांनी आंदोलन उभे केले आहे. सरकारने त्यांची फसवणूक केली. त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यांच्या आंदोलनास आमच्या सर्वांचा पाठिंबा आहे.

पालकमंत्री विखे यांच्यासह आमदार, खासदारांच्या निवासस्थानी बंदोबस्त

लोकसत्ता प्रतिनिधी

नगर : मराठा आंदोलनाला लागलेले हिंसक वळण व बीड जिल्ह्यातील आमदारांची घरे पेटवण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी नगर शहरातील पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या निवासस्थानासह राजकीय पक्षांची कार्यालये आमदार, खासदारांच्या घरांना पोलीस संरक्षण दिले आहे. या सर्व ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

मराठा आंदोलनात बीड, माजलगाव येथे आमदारांच्या घरावर हल्ले करून पेटवून देण्यात आली तसेच राष्ट्रवादी कार्यालयालाही आग लावण्यात आली. हिंगोलीत भाजप कार्यालयास आग लावण्यात आली. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी नगर शहरात खबरदारी घेतली आहे. नगर जिल्ह्यातील मंत्री आमदार, खासदारांची संपर्क कार्यालये व सर्व राजकीय पक्षांच्या कार्यालयाला पोलीस बंदोबस्त देण्यात आला आहे.

नगर शहरातील राष्ट्रवादी भवन (शरद पवार गट), काँग्रेस, भाजप कार्यालय तसेच आमदार संग्राम जगताप यांचे निवासस्थान, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे गुलमोहर रस्त्यावरील निवासस्थान, आमदार मोनिका राजळे, आमदार लहू कानडे यांचे निवासस्थान, खासदार डॉ. सुजय विखे व खासदार सदाशिव लोखंडे या दोघांचे आयटीआय जवळील संपर्क कार्यालये, माजी आमदार शिवाजी कर्डिले यांचे बुऱ्हाणनगर येथील निवासस्थान आदी ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दोन दिवसांपूर्वी नगर शहरात आयोजित करण्यात आलेल्या शिक्षकांच्या अधिवेशनात घुसून मराठा आंदोलकांनी मंत्र्यांच्या प्रतिमा असलेले फलक फाडले होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मंत्र्यांना नगरचे दौरे रद्द करावे लागले होते. महापालिकेने काल रात्री अचानक शहरात मोहीम राबवत राजकीय नेत्यांचे फलक हटवले.

VISTAAR FINANCE

विस्तार फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालयः प्लॉट नं. 59 व 60-23, 22वा क्रॉस, 29वा मेन, बीटीएम लेआउट स्टेज 2, बंगलोर- 560076. www.vistaarfinance.com
शाखा कार्यालयः # 3 रा मजला, साई अमृत बिल्डिंग, भिटे हॉस्पिटल च्या वर, बेलापूर रोड, श्रीरामपूर- 413709 महा.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना
सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 8 व 9 यासह वाचलेल्या वित्तिय मत्तेची सुरक्षितता व पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा, 2002 ची अंमलबाजावणी अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रिकरिता ई-लिलाव विक्रि सूचना.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको/सह-ऋणको/गहाणकार/हमीदारांना सूचना देण्यात येते की सुरक्षित धनकोंकडे गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा सांकेतिक ताबा सर्फेसी कायदा 2002 च्या कलम 13 (2) अंतर्गत सूचनेच्या अनुसार सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियमाच्या नियम 8 व 9 यासह वाचलेल्या कलम 13(12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत आणि सर्फेसी कायदा 2002 अंतर्गत विस्तार फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे.
सुरक्षित मत्तेची विक्री ई-लिलावाद्वारा 06-12-2023 रोजी "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे" या तत्वावर करण्यात येणार आहे.
आम जनतेस याद्वारा कळविण्यात येते की आम्ही वेबसाईटः **https://sarfaesi.auctiontiger.net** यावरर तरतूद केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारा जाहीर ई-लिलावाचे आयोजन करणार आहोत.

1. ऋणको, सह-ऋणको व गहाणकाराचे नाव 2. खाते क्र.:	मालमत्तेचे वर्णन	राखीव किंमत इसारा रक्कम ठेव (इरठे) बोली वृद्धी रक्कम	ए) मागणी सूचना तारीख बी) ताबा तारीख सी) मागणी सूचनेनुसार थकित रक्कम	ई-लिलावाची तारीख व वेळ इरठेच्या सादरीकरणाची शेवटची तारीख, मालमत्तेच्या पाहाणीची तारीख व वेळ
1. श्री. सुशांत सुभाष नगरकर 2. श्री. निखिल सुभाष नगरकर 3. सौ. नंदा सुभाष नगरकर 4. सौ. योगिता सुशांत नगरकर खाते क्र. 0071SBML01803	पुढील स्थावर मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे- सिटी सर्व्हे क्र. 1422, ग्रामपंचायत मिळकत क्र. 656/1/ए/2, जमीन क्षेत्रफळ - 1888 चौ. फू. (175.50 चौ. मी.) बिल्टअप क्षेत्रफळ 864 चौ. फू. मु. पो. शिवनेरी गल्ली बेलापूर बु. तालुका श्रीरामपूर जिल्हा अहमदनगर- 413715 जमीन आणि त्यावरील सर्व मार्ग हक्क आणि सुलभतेचे अधिकार जोडलेले आहेत. चतुःसीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः मंगल साळुंके आणि ओंकार कुवत यांच्या मालमत्तेचा सीटीएस क्र. 1423 भाग, पश्चिमः सीटीएस क्र. 1421, उत्तरः रस्ता, दक्षिणः रस्ता.	राखीव किंमत रु. 19,00,000/- इसारा रक्कम ठेव (इरठे) रु. 1,90,000 बोली वृद्धी रक्कम रु. 5,000/-	ए) मागणी सूचना तारीखः 31-01-2023 बी) सांकेतिक ताबा तारीखः 15-04-2023 सी) मागणी सूचनेनुसार थकबाकी शिल्लकः रु. 20,04,883/- ताबाः प्रत्यक्ष - 10-10-2023	ई-लिलावाची तारीख व वेळ दि. 06-12-2023 रोजी सकाळी 11:30 ते दुपारी 03:30 (प्रत्येकी 5 मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह) केवायसी सह इरठेच्या सादरीकरणाची शेवटची तारीख दि. 05-12-2023 रोजी सायं. 5:00 पर्यंत. मालमत्तेच्या पाहाणीची तारीख व वेळ 16-11-2023 आणि 24-11-2023 सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 दरम्यान

1. स्वारस्य असलेले सहभागीदार/बोलीदारांना विनंती करण्यात येते की त्यांनी **https://sarfaesi.auctiontiger.net** व **www.vistaarfinance.com** या वेबासाईटला भेट द्यावी. तपशील, मदत, प्रक्रिया व ऑनलाईन प्रशिक्षण याकरिता स्वारस्य असलेले बोलीदार संपर्क साधू शकतीलः **मेसर्स ई-प्रोक्युअरमेंट टेक्नोलॉजीस लि.; संपर्क- श्री. राम शर्मा, संपर्क क्रमांकः 8000023297 / 079-61813 6803, ईमेल आयडीः ramprasad@auctiontiger.net, support@auctiontiger.net**
2. ई-लिलावात सहभागी होण्याकरिता शर्ती व अटींवरील अधिक तपशीलाकरिता कृपया **https://sarfaesi.auctiontiger.net** व **www.vistaarfinance.com** या वेबसाईट्सला भेट द्यावी.
3. भार : प्राधिकृत अधिकारीच्या असलेल्या उत्तम ज्ञानानुसार सदर माहिती नाही. बोलीदारांना विनंती करण्यात येते की त्यांनी यथावकाश त्याबाबत स्वतः चौकशी करावी.
4. **इरठे भरणाः विस्तार फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा. लि. द्वारा अकाउंट नं. 910020011630601, ॲक्सिस बँक लि., आयएफएससी कोड यूटीआयबी0000052 यामध्ये जमा करावी.**
5. अधिक तपशील, शंका व मालमत्तेची पाहाणी याकरिता कृपया **विस्तार फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड चे संबंधित अधिकारी श्री. चेतन एन. अग्रवाल- मोबाईल क्र. 8975441419** यांच्याशी संपर्क साधावा.

ही सूचना सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम- 2002 च्या नियम 8 (6) अंतर्गत ऋणको/सह-ऋणको/गहाणकार/हमीदारांकरिता 30 दिवसीय सूचना सुद्धा समजण्यात यावी.

तारीखः 31-10-2023, स्थळः श्रीरामपूर
स्वा./-प्राधिकृत अधिकारी, विस्तार फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

जागाविषयक

गणपतीपुळे (रत्नागिरी) येथे मध्यवर्ती ठिकाणी शुध्द शाकाहारी रेस्टॉरंट अनुभवी/प्रोफेशनल व्यक्तीस भाड्याने चालविण्यास देणे आहे. संपर्कः 9422429381/ 9421245038.
0070870556-1

टूरिस्ट स्पॉट इगतपुरी, कर्जत, लोणावळा, मुळशी, पानशेत, पाचगणी, लेक व्हीव अलिबाग, दापोली, गोवा, कारवार बीचटच प्लॉट खरेदीसाठी- 8976458460. 7900189549.
0070871239-1

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग
दर रविवारी 'लोकसत्ता'तून
जीवनसाथी

भविष्यविषयक

अॅस्ट्रॉलॉजी : गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा- चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय- श्री. सुधाकर सदानंद जोशी, कु. यशश्री सुधाकर जोशी. सोमवार ते शनिवार सकाळी १० ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई- ४०००६४. 9820553276/ 9820612578. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070867808-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

यात्रा विशेष

यात्रासहल

श्रीरामकृष्ण-केरळ-तामिळनाडू- १७-११-२०२३/ ०१-१२-२०२३// संपूर्ण- राजस्थान- १८-११-२०२३/ १०-१२-२०२३/ ०२-०२-२०२४// मध्यप्रदेश- ०८-१२-२०२३// सौराष्ट्रदर्शन- स्टॅच्युऑफ-युनिटीसह- १२-१२-२०२३// नेपाळ- चितवनसह २३-११-२०२३// कर्नाटक- कुर्गसह- १६-११-२०२३/ १८-०१-२०२४/ ०९-०२-२०२४// शास्त्रोक्त- नर्मदापरिक्रमा- ०८-१२-२०२३/ ०९-०१-२०२४// त्रिस्थळीयात्रा- नैमिष्यारण्यासह- ०८-१२-२०२३// कुरवपूर- पिठापुर- ०६-१२-२०२३/ १५-०१-२०२४// हंपी- बदामी- ०१-१२-२०२३// बापट- 9137001395/ 8104288074
0070851303-9

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर (अॅडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संपत्तिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

visit us at
WWW.LOKSATTA.COM

HDB FINANCIAL SERVICES

एचडीबी फायनॅन्शीअल सर्व्हिसेस लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालयः राधिका, दुसरा मजला, लॉ गार्डन रोड, नवरंगपुरा, अहमदनगर- 380009
प्रादेशिक कार्यालयः- पहिला मजला, विल्सन हाऊस, जुना नागरदास मार्ग, अंधेरी (पू) मुंबई- 4000069
शाखा कार्यालयः- पहिला आणि दुसरा मजला, छाबडा सेंट्रल, विद्या नगर, सेव्हन हिल, जालना रोड, औरंगाबाद- 431001

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलावासाठी जाहीर सूचना

बयाणा रक्कम आणि दस्तावेज सादर करण्याचा शेवटचा दिनांक 07/12/2023 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत

सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट (सरफेसी), 2002 (2002 चा क्र. 54) अंतर्गत एचडीबी फायनॅन्शिअल सव्हिसेस लिमिटेड कडे तारण असलेल्या अचल मालमत्तेची विक्री
ज्याअर्थी, एचडीबी फायनॅन्शीअल सव्हिसेस लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी एचडीबी फायनॅन्शीअल सव्हिसेस लिमिटेड च्या थकबाकीच्या वसुलीसाठी "जशी आहे जेथे आहे आणि जशी आहे जे काही आहे" तत्त्वावर विक्री करण्याच्या अधिकारासह पुढील खात्यांमध्ये सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी) 2002 मधील अनु. 13 (2) अंतर्गत जारी केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने पुढील मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. सदर विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे **https://www.bankeauctions.com** या वेबसाईटवरवरील ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून घेण्यात येईल.

अचल मालमत्तेचे वर्णन

लॉट नं.	शाखेचे नाव, कर्ज खाते क्रमांक आणि ग्राहकाचे नाव	लिलाव विक्रींतर्गत असलेल्या तारण मालमत्तेचे वर्णन आणि ताब्याची स्थिती	मागणी सूचना तारीख थकबाकी रक्कम (सुरक्षित कर्ज)	प्राधिकृत अधिकारी तपशील	बयाणा रकमेच्या भरण्यासाठी खात्याचे तपशील	आरक्षित किंमत बयाणा रक्कम बोली वृद्धी रक्कम	ई-लिलावाची तारीख/ वेळ आणि बयाणा रक्कम सादरीकरणाची शेवटची तारीख
1	एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड, दुसरा मजला, साई मिडास टच, केदारे आर्केड, हॉटेल पटियाला हाउस समोर, नगर मनमाड रोड, सावेडी अहमदनगर, महाराष्ट्र- 414003. **कर्ज खाते क्रमांक : 7259040.** **1. आकाश क्लिनिक.** **रा.:-** एस आर क्र.- 12/29/22 ए, प्लॉट क्र. - ए-104, दुकान क्र.-1, विठ्ठल अपार्टमेंट, भिस्तबाग नाका सावेडी जवळ अहमदनगर- 414003 महाराष्ट्र. **2. जयश्री उमेश निंबाळकर.** **3. उमेश रमाकांत निंबाळकर.** **दोन्ही रा.:-** प्लॉट नं. 25, चेतना कॉलनी, नागरपूर, महालक्ष्मी पार्कजवळ, नगर मनमाड रोड अहमदनगर- 414003 महाराष्ट्र.	पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे - सर्व्हे क्र. 91/1ए2 (जुना एस. क्र. 94/1ए /2) यापैकी प्लॉट क्र. 25 मोजमाप 55.44 चौ. मी., प्लॉट क्र. 26 मोजमाप 54.00 चौ. मी., प्लॉट नं. 27 मोजमाप 54.00 चौ. मीटर, प्लॉट क्र. 28 मोजमाप 54.00 चौ. मीटर, प्लॉट क्र. 29 मोजमाप 54.00 चौ. मीटर, प्लॉट क्र. 30 मोजमाप 54.00 चौ. मीटर, प्लॉट क्र. 31 मोजमाप 64.56 चौ. मीटर, गाव नवनागापूर, अहमदनगर- 414003. चतुःसीमा :- पूर्वः 9 मीटर रस्ता, पश्चिम : प्लॉट क्र. 18 ते 24, उत्तरः एस क्र. 104/1, दक्षिणः 9 मी. रस्ता जे. **ताबा स्थिती** **प्रत्यक्ष/वास्तविक ताबा**	**13.01.2022** **दि. 13.01.2020 पर्यंत रु. 1,10,93,340.00/- (रुपये एक कोटी दहा लाख त्र्याण्णव हजार तीनशे चाळीस फक्त) आणि आनुषंगिक खर्चआणि शुल्क इत्यादींसह प्रत्यक्ष प्राप्ती होईपर्यंत भविष्यातील करार व्याज.**	**श्री. विजयकुमार सपकाळ, मोबाईल क्र. : 8888873781 ई मेल आयडी : Vijaykumar. sapkal@hdbfs.com**	खाते क्रमांक : 00210310002748 खाते नाव : एचडीबीएफएस जनरल रिसिप्ट्स, आयएफएससी कोड : HDFC0000021 बँकः एचडीएफसी बँक लि शाखाः हैदराबाद- लकडी का पूल एमआयसीआर कोड- 500240002	**रु. 1,39,58,239/-** (रु. एक कोटी एकोणचाळीस लाख अठ्ठावन्न हजार दोनशे एकोणचाळीस फक्त) **बयाणा रक्कमः रु. 13,95,823/-** (रु. तेरा लाख पंच्याण्णव हजार आठशे तेवीस फक्त). ***15,000.00/-**	**08/12/2023** **स.11 ते सायं. 5** सर्वाधिक बोलीनंतर सहभागींनी दिलेल्या खुल्या बोलीनंतर 5 मिनिटांच्या अमर्यादित विस्तारांसह. **बयाणा रक्कम सादरीकरणाची शेवटची तारीख 07/12/2023 स.11 ते सायं. 5**

अटी व शर्तीःसदर ई-लिलाव "जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे" आणि " तेथे जे काही आहे" तत्त्वावर घेण्यात येत आहे.

1. प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार सदर मालमत्तेवर कोणतेही बोजे नाहीत. परंतु, इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी बोजे, लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेचा मालकी हक्क आणि मालमत्तेवर परिणाम करू शकणारे दावे / अधिकार / थकबाकी इ. बाबत स्वतंत्रपणे चौकशी करावी. सदर ई-लिलाव जाहिरात एचडीबी फायनॅन्शीअल सव्हिसेस लिमिटेड यांचेकडून देण्यात येणारे वचन नाही किंवा त्यांचे प्रतिनिधित्वसुद्धा करीत नसून तसे समजण्यात येऊ नये. सदर मालमत्तेची विक्री एचडीबी फायनॅन्शीअल सव्हिसेस लिमिटेड यांना ज्ञात किंवा अज्ञात अशा सर्व वर्तमान व भावी बोज्यांसह करण्यात येत आहे. कुणीही कोणत्याही प्रकारचा दावा / अधिकाराची / थकबाकीची मागणी केल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको जबाबदार नसतील.
2. बोली सादर करण्याअगोदर मत्तेची आणि विनिर्देशांची पाहणी करून स्वतःची खात्री करून घेण्याची जबाबदारी बोलीदाराची असेल. इच्छुक बोलीदारांना दि. 06.11.2023 ते06.11.2023 पर्यंत (कामकाजाच्या वेळेत)लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेची पाहणी करता येईल. इच्छुक बोलीदार आपली बयाणा रक्कम **https://www.bankeauctions.com** या वेब पोर्टलच्या माध्यमातून सदर करू शकतात. (**https://www.bankeauctions.com** येथे नाव नोंदवून युजर आयडी आणि पासवर्ड निःशुल्क प्राप्त करता येईल). वर नमूद खात्यामध्ये बयाणा रक्कम एनईएफटी द्वारे देय असेल. बोलीदाराने वेब पोर्टलवर नोंदणी (वन टाईम) केल्यानंतर इच्छुक बोलीदार / खरेदीदारास बोली दस्तावेजांच्या सादरीकरणाच्या शेवटचा दिनांक व वेळेअगोदर वेब पोर्टलवर पुढील दस्तावेजांच्या प्रती अपलोड कराव्या लागतील, i) एनईएफटी / आरटीजीएस चलन किंवा डिमांड ड्राफ्टची प्रत, ii) पॅन कार्डची प्रत, iii) मतदार ओळखपत्र / चालक परवाना/पारपत्र इ. ची स्वाक्षांकित प्रत सारखा ओळखीचा / पत्त्याचा पुरावा (केवायसी) त्यांशिवाय बोली फेटाळण्यास पात्र ठरेल. परिशिष्ट -II व III (**https://www.bankeauctions.com** या वेब पोर्टलवरून डाउनलोड करता येईल) नोंदणी करून ची स्कॅन केलेली प्रत भरून आणि स्वाक्षरी करून ती अपलोड करणेसुद्धा आवश्यक आहे. ज्या इच्छुक बोलीदारांना लॉग इन आयडी व पासवर्ड तयार करणे, माहिती अपलोड करणे, बोली दस्तावेज सादर करणे, ऑनलाईन आपसांत बोली बोलीबाबत प्रशिक्षण / प्रात्यक्षिक इ. बाबत मदत हवी आहे त्यांनी येथे संपर्क साधावा : मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, उद्योग विहार, फेज 2, गल्फ पेट्रोकेम इमारत, इमारत क्रमांक 301, गुडगाव, हरियाणा. पिनः 122015, ई-मेल आयडीः **support@bankeauctions.com,** सपोर्ट हेल्पलाइन क्रमांकः 124-4302020/21/22/23, 7291981124/1125/1126, विक्री चौकशीः **sales@bankeauctions.com,** 7291981129 या क्रमांकावर संपर्क साधू शकता. आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही प्रश्नासाठी **एरिया कलेक्शन मॅनेजरः श्री. श्याम तेलंग; मोबाईल क्रमांक : 9970061659, ईमेल आयडीः shyam.telang@hdbfs.com** आणि **अधिकृत अधिकारीः श्री. विजयकुमार सपकाळ, मोबाईल क्रमांकः 8888873781 ईमेल आयडीः vijaykumar.sapkal@hdbfs.com** यांच्याशी सोमवार ते शनिवार या कामकाजाच्या वेळेत संपर्क साधू शकता.
3. इच्छुक बोलीदारांनी आपले बोली दस्तावेज [बयाणा रक्कम (आरक्षित किमतीपेक्षा कमी नसलेली) आणि आवश्यक कागदपत्रे (मुद्दा क्र. 4 मध्ये नमूद)] 07/12/2022 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत सादर करावेत आणि नोंदणी प्रक्रिया (वन टाईम)पूर्ण केल्यानंतर व त्यांनी स्वतः युजर आयडी व पासवर्ड जनरेट केल्यानंतर ते ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र ठरतील, परंतु हे प्राधिकृत अधिकारयाने (दस्तावेजांची) पडताळणी करण्याच्या आणि / किंवा त्यांच्या मंजुरीच्या अधीन असेल.
4. ऑनलाईन आपसांत बोलीदरम्यान बोलीदारांना आपली बोलीमध्ये (वर नमूद करण्यात आलेल्या) 'बोली वृद्धी रकमेच्या' पटीत वृद्धी करता येईल आणि ई-लिलाव संपण्याच्या वेळेच्या शेवटच्या 5 मिनिटांत बोली देण्यात आल्यास बंद होण्याची वेळ (ई-लिलाव समाप्त होईपर्यंत प्रत्येक वेळी)आपोआप 5 मिनिटांनी वाढेल आणि, अन्यथा तो आपोआप बंद होईल. ई-लिलाव प्रक्रिया संपतेवेळी सर्वोच्च बोली रक्कम सादर करणारया (आरक्षित किमतीपेक्षा कमी नसावी) बोलीदारास पडताळणीनंतर प्राधिकृत अधिकारी/सुरक्षित धनकोद्वारे यशस्वी बोलीदार घोषित करण्यात येईल.
5. यशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम विक्री रकमेचा काही भाग म्हणून ठेवून घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल. बयाणा रकमेवर व्याज देण्यात येणार नाही. यशस्वी बोलीदारास प्राधिकृत अधिकाऱ्याने बोलीची किंमत स्वीकारल्यानंतर 24 तासांच्या आत बयाणा रक्कम समायोजित करून विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम जमा करावी लागेल आणि विक्री किमतीपैकी उर्वरित 75% रक्कम विक्रीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत किंवा प्राधिकृत अधिकारी लेखी मंजूर करतील त्या वाढीव कालावधीत सादर करावी लागेल. यशस्वी बोलीदाराने याप्रकारे भरणा करण्यात कसूर केल्यास त्याने तोवर भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि मालमत्तेचा पुन्हा लिलाव करण्यात येईल आणि अशी कसूर करणारया कर्जदारास सदर मालमत्ता / रकमेवर कोणताही दावा करता येणार नाही.
6. संभाव्य अर्हताधारक बोलीदार ई-लिलावाच्या दिनांकाअगोदर मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेडयांचेकडून ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण प्राप्त करू शकतात. इंटरनेट/ नेटवर्कची समस्या उद्भवल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी / एचडीबी फायनॅन्शीअल सव्हिसेस लिमिटेड किंवा मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेडजबाबदार नसतील आणि ई-लिलावात सहभागी होण्यासाठी आपण तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहोत किंवा नाही याची पाहणी करून आवश्यक ती तयारी करण्याची जबाबदारी इच्छुक बोलीदारांची असेल.
7. लागू असलेले मुद्रांक शुल्क / अतिरिक्त मुद्रांक शुल्क/हस्तांतरण शुल्क इ. चा तसेच कुणासही देणे असलेली वैधानिक/ बिगर-वैधानिक थकबाकी, कर, दर, मूल्यांकन शुल्क, अधिभार इ. भरणा करण्याची जबाबदारी खरेदीदाराची असेल.
8. प्राधिकृत अधिकारी सर्वोच्च प्रस्ताव स्वीकारण्यास बांधील नसून त्यांना कोणतेही कारण न देता कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा तसेच ई- लिलाव बरखास्त करणे/ पुढे ढकलणे / रद्द करण्याचाही अधिकार असेल.बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी आणि ई-लिलावात सहभागी होण्यापूर्वी मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड च्या वेब पोर्टलला **https://www.bankeauctions.com** येथे उपलब्ध असलेल्या अटी व शर्तींचा तपशील पाहावा.
9. बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी आणि ई-लिलावात सहभागी होण्यापूर्वी मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या वेब पोर्टलला **https://www.bankeauctions.com** येथे उपलब्ध असलेल्या अटी व शर्तींचा तपशील पाहावा.

विशेष सूचना :

10. बोलीदारांनी स्वतःचे हित लक्षात घेता शेवटच्या क्षणी बोली देणे टाळावे कारण अशा वेळी कोणतीही समस्या उद्भवल्यास (इंटरनेट संपर्क तुटणे / वीजपुरवठा खंडित होणे इ.) त्यासाठी एचडीबी फायनॅन्शीअल सव्हिसेस लिमिटेड किंवा सेवा पुरवठादार जबाबदार नसतील. अशी अप्रिय परिस्थिती टाळण्यासाठी बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वीजपुरवठा, बॅक-अप यांसारखी सर्वी आवश्यक ती व्यवस्था/पर्याय तयार ठेवावेत जेणेकरून त्यांना अशा अडचणींवर मात करून लिलावात यशस्वीपणे सहभागी होता येईल.

सरफेसी अधिनियम, 2002 अंतर्गत 30 दिवसांची वैधानिक विक्री सूचना

याद्वारे कर्जदार / जामीनदार यांना सूचित करण्यात येते की त्यांनी वर नमूद रकमेचा आणि अद्ययावत व्याज व आनुषंगिक खर्चाचा ई-लिलावाच्या दिनांका अगोदर भरणा करावा, अन्यथा मालमत्तेचा लिलाव / विक्री करण्यात येईल आणि काही थकबाकी शिल्लक राहिल्यास ती व्याज व शुल्कासह वसूल करण्यात येईल.

स्थानः अहमदनगर
दिनांकः 01.11.2023
स्वा./- प्राधिकृत अधिकारी,
एचडीबी फायनॅन्शीअल सव्हिसेस लिमिटेड